# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०६/ २०१६** **दिनांक १९.०५.२०१६**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ५.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १९.०५.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६८६/ २०१६, दिनांक १६ मे, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ७४६/ २०१६, दि.१८ मे, २०१६ अन्वये काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा सायंकाळी ०५.०० वाजता ऐवजी दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक १९.०५.२०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०६.०५.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३०६** दिनांक ०६.०५.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १३.०५.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३०७** दिनांक १३.०५.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करुन घेणेकामी प्राप्त ई-निविदा दरपत्रक उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०६.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.१६२ अन्वये श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करणेकामी नॉनवूल पिशवीधारकांकडून दरपत्रके मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. जर निविदा चौकशीला कमी प्रतिसाद, म्हणजे ३पेक्षा कमी निविदाकार मिळाले तर निविदा उघडण्याचा कालावधीस प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील ३ पेक्षा कमी निविदाकार मिळाले तर दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात यावी तथापि त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये. अंतिमत: खरेदी अधिका-याने निविदेमधील विविध अटी आणि कामाच्या व्याप्तीचा फेरविचार करुन, पुन्हा निविदा प्रक्रिया सुरु करावी. पुन्हा निविदा मागविल्यानंतर देखील निविदेला ३ पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तर, खरेदी अधिकारी ज्या निविदाकाराने (एल १ निविदाकार) निविदा दाखल केली असेल त्या निविदाकाराची, निविदेमध्ये उल्लेख केलेल्या मूल्यांकन निकषाच्या अधीन राहून, निविदा करुन त्या निविदाकाराबरोबर करार करेल.

रुपये दहा (१०) लाखापेक्षा कमी रक्कमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदे पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल.

उपरोक्त नियमांचे पालन करुन दि. २१.०१.२०१६ ते दि. ३१.०१.२०१६ या कालावधीत नॉनवूल पिशवीधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर कालावधीत एकच दरपत्रक प्राप्त झाल्याने फेर दुस-यांदा दि. १०.०३.२०१६ ते दि. १९.०३.२०१६ या कालावधीत ई निविदा दरपत्रके मागविण्यात आले असता, Classic Stationers Co. Mumbai यांचे एकच दरपत्रक प्राप्त झाले आहे.

Classic Stationers Co. Mumbai यांचे ई निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) पाकिट दि.०७.०४.२०१६ रोजी खरेदी समितीपुढे उघडण्यात आले ई निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) चे पाकिटातील कागदपत्रांची पडताळणी अंतर्गत लेखापरीक्षक यांनी केली असता ते तांत्रिक निविदा (Technical Bid) मध्ये पात्र आहेत. त्यामुळे त्यांचे ई निविदा दरपत्रक (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | दरपत्रकामधील मुळ दर प्रति नग रु. |
|---|---|---|
| 01 | नॉनवूल पिशवी 100000 नग | ५.८५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करुन घेणेकामी प्राप्त झालेले उपरोक्त दर अंदाजीत खर्चापेक्षा खुपच जास्त असल्यामुळे सदरहूकामी जाहिरात देण्यात येऊन फेर ई-निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०२ **सन- २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकरीता प्राप्त दरपत्रके (कोटेशन) उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लांवणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. |
| ०५ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रं.६३४ पुढीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे. "..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेत येऊन एजन्सीची नेमणूक करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी वितरीत केले जाते. सदरचे शुध्द केलेले पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याची नमुन्यांची तपासणी होणे आवश्यक असल्याने पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेसाठी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रं.६३४ अन्वये प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेत येऊन एजन्सीची नेमणूक करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४ प्र.कं.८२/भाग- III/उदयोग-४, मंत्रालय, मुंबई दि.३० ऑक्टोबर, २०१५ मधील अ.नं.९ नुसार सदरचे काम रु.३ लक्ष पेक्षा कमी रकमेचे असलेने अशा प्रकारचे काम करणा-या एजन्सीजकडुन दरपत्रके मागवून सदरचे काम करावे लागेल. याकाकामी पाणी पुरवठा विभाग टिपणी दि. २४ फेब्रूवारी २०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार पाणी तपासणी एजन्सीजचे दरपत्रके प्राप्त झालेली आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल/नांव | प्रशासनशाखा आवक नं./दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि,नाशिक | नं.२४५८४ दि.१५.०३.२०१६ | बंद कोटेशन |
| ०२ | एनव्हायरो टच, औरंगाबाद | नं. २४९५९ दि.१९.०३.२०१६ | बंद कोटेशन |
| ०३ | अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, नाशिक | नं. २४७३९ दि.१६.०३.२०१६ | बंद कोटेशन |

सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकरीता प्राप्त झालेली ०३ दरपत्रके (कोटेशन) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर प्रति सॅम्पल रु. |
|---|---|---|
| १ | एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि, नाशिक | १३७४/- |
| २ | एनव्हायरो टच, औरंगाबाद | १८८९/- |
| ३ | अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, नाशिक | ९१६/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकरीता अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, नाशिक यांचे प्रती नमुना एकत्रित रु.९१६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**०३. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व्हे नं.१ मधील संस्थानला मिळणा-या जागेसाठी कंपाऊंड करणेसाठी एम.एस.ॲंगल खरेदीकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

सर्व्हे नं.1 मधील 101 दुकानदारांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासन व नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सदर दुकाने काढून टाकण्याची कार्यवाही करणेत येत आहे. रिकाम्या होणा-या जागेवर पुन्हा अतिक्रमणे होऊ नये यासाठी चैनलिंक जाळी लावणेकरीता एम.एस. ॲंगलचे पोल उभे करणेसाठी आवश्यक ॲंगल परिसरातील पुरवठाधारक यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 92,000/- मात्र खर्चाचे प्रस्तावास दिनांक 29/03/2016 रोजी मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/55/2016 दिनांक 5 एप्रिल, 2016 अन्वये 9 पुरवठाधारकांना मटेरिअल पुरविणे याकामी कोटेशन मागविणेबाबत पत्रे पाठविण्यात आली होती. पैकी खालील तपशीलाप्रमाणे 5 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत:

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमाक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Asian Sales Corporation, Nashik | 384 | 06/04/2016 |
| 2. | Union Trading, Nashik | 388 | 06/04/2016 |
| 3. | Maheshwari Steel Traders, Babhaleshwar | 389 | 06/04/2016 |
| 4 | Super Fabrication & Furniture, Sakuri | 392 | 06/04/2016 |
| 5 | Bhansali Motors, Sakuri | 394 | 06/04/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 5 कोटेशन आवश्यक फॅब्रिकेशन मटेरिअल पुरविणेकामी प्राप्त झालेली आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व्हे नं.1 मधील संस्थानला मिळणा-या जागेसाठी कंपाऊंड करणेकामी एम.एस. ॲंगल खरेदीकामी प्राप्त झालेली 05 कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | MS Angle 50x50x5 mm कोटेशनमधील मुळ दर प्रती किलो रु. |
|---|---|---|
| 1. | अशियन सेल्स कॉ. लि., नाशिक | ४३.६० |
| 2. | युनियल ट्रेड्रींग, नाशिक | ४४.३६ |
| 3. | माहेश्वरी स्ट्रील ट्रेडर्स, बाभळेश्वर | ३६.७५ |
| 4 | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी | ३८.०० |
| 5 | भनसाळी मोटर्स, साकुरी | ३८.३३ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व्हे नं.१ मधील संस्थानला मिळणा-या जागेसाठी कंपाऊंड करणेसाठी एम.एस.ॲंगल खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्तयामधील माहेश्वरी स्ट्रील ट्रेडर्स, बाभळेश्वर यांचे प्रती किलो रु.३६.७५ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०४ **नवीन भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह, द्वारावती इमारत येथील सोलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

नविन भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह, द्वारावती इमारत येथील सोलर यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 6,00,000/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 10/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 509 अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ई निविदा दिनांक 21/3/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक 1/04/2016 ई टेंडर भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानुसार खालील तीन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Jain Irrigation System ltd, Jalgaon | 3. | Akson Solar Equipment Pvt. Ltd. Pune |
| 2. | Unique Solar System, Nashik | | |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त तिन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

नविन भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह, द्वारावती इमारत येथील सोलर यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | अक्शन सोलर इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे | ४,८२,०००/- |
| 2. | जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगाव | ३,८९,७५०/- |
| 3. | युनिक सोलर सिस्टीम, नाशिक | ४,९५,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह, द्वारावती इमारत येथील सोलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगाव यांचे रु.३,८९,७५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०५ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सोलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सोलर यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 7,00,000/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 10/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.481 अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ई निविदा दिनांक 21/3/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक 1/04/2016 ई टेंडर भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानुसार खालील तीन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Jain Irrigation System ltd, Jalgaon | 3. | Akson Solar Equipment Pvt. Ltd. Pune |
| 2. | Uniquee Solar System, Nashik | | |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त तिन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील सोलर यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगाव | ४,८९,८००/- |
| 2. | युनिक सोलर सिस्टीम, नाशिक | ६,८९,०००/- |
| 3. | अक्शन सोलर इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे | ७,००,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सोलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगाव यांचे रु.४,८९,८००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) करीता वार्षिक AMC/ Operation & Maintenance देणेकामी दुसरे वेळेस प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीसाठी वार्षिक AMC/Operation & Maintenance देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 9,00,000/- मात्रचे खर्चास दिनांक 16/02/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 132) नुसार मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार दिनांक 21.03.2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. सदर कालावधीमध्ये फक्त एकच ई निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक 20.4.2016 रोजी ई निविदा फेर (दुसरी वेळेस) अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक 28/04/2016 ई टेंडर भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानुसार खालील तीन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Green Scientific Development (I) Pvt. Ltd., Mumabi. | 3. | Panse Consultants, Pune. |
| 2. | Yash Enviro Technologies, Pune | | |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 04/05/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, पी. एफ सर्टिफिकेट, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., ब्लॅक लिस्ट झालेले नसल्याने अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त तिन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल करीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रकिया सयंत्र करीता वार्षिक AMC देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | पानसे कन्सलटंटस्, पुणे | ७०,०००/- (प्रती माह) |
| 2. | ग्रीन सायंटिफीक डेव्हलोपमेंट (इं) प्रा.लि., मुंबई | ७२,०००/- (प्रती माह) |
| 3. | यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे | ८,९८,०००/- (वार्षिक) |

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) करीता वार्षिक AMC/ Operation & Maintenance देणेकामी अ.नं.३ चे यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांनी निविदेतील अटी/ शर्तीप्रमाणे वार्षिक दर दिलेले असून अ.नं.०१ चे पानसे कन्सलटंटस्, पुणे व अ.नं.०२ चे ग्रीन सायंटिफीक डेव्हलोपमेंट (इं) प्रा.लि., मुंबई यांनी प्रती महिन्यासाठी दर दिलेले असल्याचे निदर्शनास आले व तसे त्यांनी लेखी स्वरुपातही सभेस कळविले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) करीता वार्षिक AMC/ Operation & Maintenance देणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील दरांपैकी वार्षिक निम्नतम दर येणा-या दरधारकास कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०७ **श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग,स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्याकामी ई-निविदांची मागणी करणेत येवून येणाऱ्या खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.28/12/2015 व दि.02/02/2016 रोजीचे सभेतील निर्णयानूसार विधी

विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं.3709/2016 दाखल करणेत येवून ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची सदरहु खर्चास दि.23/03/2016 रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार ई-निविदा दिनांक 14/03/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक 26/03/2016 रोजी ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानूसार खालील पाच निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | सुमीत फॅसिलीटीज प्रा.लि, पुणे |
| 2. | बी.व्ही.जी.इंडीया लि., पुणे |
| 3. | अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडिया प्रा.लि., पुणे |
| 4. | स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई |
| 5. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था,नाशिक |

उपरोक्त प्राप्त 5 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील बयाणा रक्कमेचा, टेंडरचा डि.डी, कंपनीची वार्षिक उलाढाल, आय.एस.ओचे प्रमाणपत्र, टेंडरमधील मनुष्यबळ व यांत्रिकी तक्ता, अनुभवाचे दाखले, औद्योगिक रजिस्ट्रेशन नोंदणी व अत्याधुनिक मशिनरीची यादी, पॅन नंबर इत्यादी बाबी मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचेकडून चेक केलेल्या असून उपरोक्त पाचही निविदांपैकी वरील तक्त्यातील अं.नं.1 ते 4 निविदा पात्र आहेत, पैकी अं.नं.5 ची निविदा ही अपात्र ठरलेली आहे. त्यामुळे वरील अं.नं.1 ते 4 पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकरीता प्राप्त व पात्र 04 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील प्रती माह मूळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | सुमीत फॅसिलीटीज प्रा.लि, पुणे | २१,२३,५५७.०३ |
| 2. | अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडिया प्रा.लि., पुणे | २५,६६,८५३.०० |
| 3. | बी.व्ही.जी.इंडीया लि., पुणे | २२,५०,०३७.०० |
| 4. | स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | १४,४९,९९९.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे प्रती माह एकत्रित रु.१४,४९,९९९/- मात्र (सर्व करांसहीत) निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईप्रसादालयात मनुष्यबळाद्वारे चपाती/ पुरी तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाद्वारे चपाती/पुरी तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्याकामी ई-निविदांची मागणी करणेत येवून येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.28/12/2015 व दि.02/02/2016 रोजीचे सभेतील निर्णयानूसार विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं.3620/2016 दाखल करणेत येवून ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची सदरहु खर्चास दि.23/03/2016 रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार ई-निविदा दिनांक 14/03/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक 26/03/2016 रोजी ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानूसार खालील तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर |
| 2. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी |
| 3. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील बयाणा रक्कमेचा, टेंडर फीचा डि.डी, लेबर लायसन, अन्न औषध प्रशासन यांचेकडील केटरींग परवाना, कंपनीची वार्षिक उलाढाल, सर्व्हीस टॅक्स नंबर, प्रॉ.फंड कोड नंबर, अनुभवाचे दाखले, पॅन नंबर इत्यादी बाबी मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचेकडून तपासून घेतलेल्या असून उपरोक्त तीनही निविदा पात्र आहेत. त्यामुळे वरील अं.नं.1 ते 3 पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाद्वारे चपाती/पुरी तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव | स्वामीनारायण चपाती बनविणेकामीचा निविदेमधील प्रती क्विंटल दर रु. | पुरी बनविणेकामीचा निविदेमधील प्रती क्विंटल दर रु. |
|---|---|---|---|
| 1. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | ९७५/- | ९५०/- |
| 2. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक | **७६४/-** | **७६४/-** |
| 3. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी | ११००/- | १०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयात मनुष्यबळाद्वारे स्वामीनारायण चपाती तसेच पुरी तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले सर्व करांसहीत प्रती क्विंटल निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

०९ **श्री साईप्रसादालयात चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयात चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्याकामी ई-निविदांची मागणी करणेत येवून येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता मिळणेसाठी संदर्भिय अं.नं.1 व 2 नूसार विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं.3708/2016 दाखल करणेत येवून ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची सदरहु खर्चास दि.23/03/2016 रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार ई-निविदा दिनांक 14/03/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक 26/03/2016 रोजी ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानूसार खालील तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर |
| 2. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी |
| 3. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था,नाशिक |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील बयाणा रक्कमेचा, टेंडर फीचा डि.डी, लेबर लायसन, अन्न औषध प्रशासन यांचेकडील केटरींग परवाना, कंपनीची वार्षिक उलाढाल, सर्व्हीस टॅक्स नंबर, प्रॉ.फंड कोड नंबर, अनुभवाचे दाखले, पॅन नंबर इत्यादी बाबी मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचेकडून तपासून घेतलेल्या असून उपरोक्त तीनही निविदा पात्र आहेत. त्यामुळे वरील अं.नं.1 ते 3 पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

श्री साई प्रसादालयात चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील प्रती क्विंटल दर रु. |
|---|---|---|
| 1. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक | **३२३.९०** |
| 2. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी | ४९०.०० |
| 3. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | ४५०.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयात चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांचे प्रती क्विंटल रु.३२३.९० (सर्व करांसहीत) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

१० **श्री साईप्रसादालयात साईभक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकिटे तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयात साईभक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्याकामी ई-निविदांची मागणी करणेत येवून येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता मिळणेसाठी संदर्भिय अं.नं.1 व 2 नूसार विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं.3493/2016 दाखल करणेत येवून ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची सदरहु खर्चास दि.31/03/2016 रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार ई-निविदा दिनांक 14/03/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक 26/03/2016 रोजी ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानूसार खालील तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर |
| 2. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी |
| 3. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक |

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 18/04/2016 रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील बयाणा रक्कमेचा, टेंडर फीचा डि.डी, लेबर लायसन, अन्न औषध प्रशासन यांचेकडील केटरींग परवाना, कंपनीची वार्षिक उलाढाल, सर्व्हीस टॅक्स नंबर, प्रॉ.फंड कोड नंबर, अनुभवाचे दाखले, पॅन नंबर इत्यादी बाबी मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचेकडून तपासून घेतलेल्या असून तीनही निविदा पात्र आहेत. त्यामुळे वरील अं.नं.1 ते 3 पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

श्री साई प्रसादालयात साईभक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे तयार करणेचे काम सन 2016-2017 या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकरीता प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील प्रती अन्नपाकिट दर रु. |
|---|---|---|
| 1. | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | १.८० |
| 2. | दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक | १.४० |
| 3. | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी | १.८० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयात साईभक्तांना अल्पोपहार म्हणून अंदाजे ४० ग्रॅम वजनाच्या ३ नग चपाती अथवा २५ ग्रॅम वजनाच्या ५ नग पु-या, सुक्की भाजी, बर्फी किंवा शिरा (अंदाजे २५० ते २७५ ग्रॅम वजनाचे प्रती अन्नपाकिट) तयार करणेचे काम सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांचे प्रती अन्नपाकिट रु.१.४० मात्र (सर्व करांसहीत) निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

११ **संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकरीता आवश्यक टू सीटर बेंचेस खरेदीकामी तिस-यांदा मागविलेल्या ई-निविदांचे Financial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक टु सिटर बेंचेस खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,७५,०००/- (अक्षरी रु.आठ लाख पंचाहत्तर हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३२० (०६) नुसार मान्यता मिळालेली होती.

बेंचेस खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२१.०३.२०१६ ते दि.३१.०३.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया तिस-यांदा राबविणेत आलेली होती. याकामी दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया असल्यामुळे खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त होऊनही सदरच्या तांत्रिक निविदा दिनांक ०७.०४.२०१६ रोजी Online उघडण्यात आल्या होत्या.

अ) मे.रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर

ब) मे.हायकॉन, औरंगाबाद

वरील तांत्रीक निविदा उघडून दोन्हीही निविदाधारकांचे कागदपत्रांची तपासणी केली असता (अ) मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर व (ब) मे.हायकॉन, औरंगाबाद यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तसेच निविदा फी व बयाणा रकमेचे डिमांड ड्राफटसही सादर केलेले आहेत. त्यामुळे वरील दोन्हीही ई-निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत.

वरीलप्रमाणे Technical Bid मध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकाचे Financial Bid आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| 1. | मे.हायकॉन, औरंगाबाद | १२,३६०/- |
| 2. | मे.रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर | ११,९८६/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकरीता आवश्यक असणा-या टू सीटर बेंचेस खरेदीकामी मे.रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे प्रती नग रु.११,९८६/- मात्र निम्नतम दर मिळालेले आहेत. परंतु या दराने १०० नग बेंचेस खरेदीकामी रु.११,९८,६००/- मात्र खर्च येणार असून सदरचा खर्च मंजुर रकमेपेक्षा जास्त असल्यामुळे याबाबत मार्गदर्शन घेणेसाठी मा.त्रीसदस्य समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१२ **संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे इंधन खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.४०६ नुसार, संस्थान वाहनासाठी तसेच विद्युत जनीत्रांना लागणारे इंधन (पेट्रोल/डिझेल) दि.१३/०६/२०१३ पासुन मे.साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी दि.०९/०७/२०१३ पासुन मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., प्रवरानगर (मार्केट यार्ड साकुरी येथील पेट्रोलपंप) व श्री साई सर्व्हीस, सावळीविहीर येथून चालु दरात ०.३० पैसे प्रति लिटर प्रमाणे सवलत व इंधन खरेदी बिलास एक महिन्याचे क्रेडीटवर खरेदी करण्यात येत आहे.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८८ नुसार, संस्थान वाहनासाठी तसेच विद्युत जनीत्रांना लागणारे इंधन खरेदी कामी अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील शिर्डी पासुन ०५ कि.मी. अंतरावरील पेट्रोलपंपधारकाकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणेबाबत सुधारीत पत्र घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान वाहने, विद्युत जनित्र, स्टिम बॉयलर तसेच इतर विभागांना आवश्यकतेनुसार, इंधन (डिझेल/ पेट्रोल) पुरवठा करणे बाबत प्रचलित इंधन दरात किती सवलत देणार व इंधन खरेदीचे बिलास किती महिनेचे क्रेडीट देणार या कामी अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील शिर्डी पासुन ०५ कि.मी. अंतरावरील पेट्रोलपंपधारकाकडून इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/६८७५/२०१६ दि.१२/०३/२०१६ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे १० पेट्रोलपंपधारकांना कळविण्यात आले होते.

| अ.नं. | पेट्रोलपंपधारकांचे नांव व पत्ता |
|---|---|
| ०१ | श्री साई सर्व्हीस, सावळीविहीर |
| ०२ | S.K.G's. साईसिध्दी पेट्रोलियम, साकुरीशिव, शिर्डी |
| ०३ | मा.आमदार श्री.राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., प्रवरानगर संचलित साकुरी शिव, शिर्डी |
| ०४ | साई समर्थ पेट्रोलियम, लक्ष्मीवाडी |
| ०५ | आर पेट्रोलियमफ्युएल्स .जे., मु.सावळीविहीर खु .पो. |
| ०६ | मेसाईदिप पेट्रोलियम ., मुनिघोज .पो., काळेवस्ती, |
| ०७ | श्री साई सद् भावना पोलिस पेट्रोलपंप, शिर्डी |
| ०८ | श्री बोरावके ब्रदर्स, मुराहाता .ता.पो. |
| ०९ | श्री.कुंदन पेट्रोलियम, राहाता |
| १० | मे जाधव.पी.बी.& कंपनी, मुशिर्डी .पो. |

उपरोक्त अ.नं. ०१ ते १० पेट्रोलपंपधारकांपैकी खालील प्रमाणे अ.नं.०१ चे पेट्रोलपंपधारकांचे खुले पत्र अ.नं.०२ ते ०५ पेट्रोलपंपधारकांचे बंद पाकिट मुदतपुर्व दि.१७/०३/२०१६ रोजी तसेच अ.नं. ०६ पेट्रोलपंपधारकांचे बंद पाकिट उशिरा दि.१९/०३/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | पेट्रोलपंपधारकांचे नांव व पत्ता | आवक क्रदिनांक / . | |
|---|---|---|---|
| ०१ | S.K.G's साईसिध्दी पेट्रोलियम, साकुरीशिव, शिर्डी | २४८१७-१७२०१६/०३/ | खुले पत्र |
| ०२ | मे.साईदिप पेट्रोलियम, निघोज | २४६८२२०१६/०३/१६- | बंद पाकिट |
| ०३ | श्री.कुंदन पेट्रोलियम, राहाता | २४८१०२०१६/०३/१७- | बंद पाकिट |
| ०४ | साई समर्थ पेट्रोलियम, लक्ष्मीवाडी | २४८३२२०१६/०३/१७- | बंद पाकिट |
| ०५ | मा.आमदार श्री.राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., प्रवरानगर संचलित साकुरी शिव, शिर्डी | २४८३४२०१६/०३/१७- | बंद पाकिट |
| ०६ | श्री साई सर्व्हीस, सावळीविहीर | २४९६९२०१६/०३/१९- | बंद पाकिट |

उपरोक्त अ.नं.०१ चे पेट्रोलपंपधारक S.K.G's साईसिध्दी पेट्रोलियम, साकुरीशिव, शिर्डी यांना दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४०६ नुसार दि.१३/०६/२०१३ पासुन प्रचलित दरात ०.३० पैसे प्रति लिटर सवलत व इंधन खरेदी बिलास एक महिन्याचे बाबत पुरवठा आदेश दिलेला आहे. त्यांनी दि.१७/०३/२०१६ रोजीचे पत्राने "आम्ही दि.०७/०२/२०१३ रोजी आपणांस इंधनाचे (पेट्रोल/ डिझेल) चालु दरात ३० पैसे प्रति लिटर सवलतीचे कोटेशन दिले होते व त्याप्रमाणे आपणांस इंधन पुरवठा सुरु आहे. गेल्या वर्षभरात सततच्या दरबदल्यामुळे आम्हांला सदरच्या सवलती प्रमाणे इंधन पुरवठा करणे शक्य होत नसल्याने ३१ मार्च-२०१६ पर्यंत आम्ही आपणांस सदरच्या सवलतीच्या दरात इंधन पुरवठा करु शकतो. तरी आपणांस दि.०१ एप्रिल-२०१६ पासुन चालु दराने इंधन पुरवठा करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी", असे कळविलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे S.K.G's साईसिध्दी पेट्रोलियम, साकुरीशिव, शिर्डी यांचे दि.१७/०३/२०१६ रोजीचे पत्रावर तसेच अ.नं. ०२ ते ०६ पेट्रोलपंपधारकांची प्राप्त झालेली बंद पाकिटे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पेट्रोलपंपधारकाचे नाव | दरपत्रकामध्ये देऊ केलेले (प्रचलीत इंधन दरात प्रती लिटर सवलतीचा) दर रु. | इंधन बिलास क्रेडीत देत असलेचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.साईदिप पेट्रोलियम, निघोज | १.१० (फक्त डिझेलकरीता) | रोख अथवा ॲडव्हान्स दिल्यास सवलत दर लागू | अटी/ शर्तीनुसार **अपात्र** |
| २ | श्री.कुंदन पेट्रोलियम, राहाता | ०.५१ | १५ दिवस | अटी/ शर्तीनुसार **अपात्र** |
| ३ | साई समर्थ पेट्रोलियम, लक्ष्मीवाडी | ०.३० | ३० दिवस | अटी/ शर्तीनुसार पात्र |
| ४ | मा.आमदार श्री.राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी | **०.५०** | **३० दिवस** | अटी/ शर्तीनुसार पात्र |
| ५ | श्री साई सर्व्हीस, सावळीविहीर | ०.३० | ३० दिवस | अटी/ शर्तीनुसार पात्र |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी मा.आमदार श्री.राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी यांचे प्रचलीत इंधन दरामध्ये रु.०.५० मात्र सवलत व मागणीतील अटी/ शर्तीनुसार बीलास ३० दिवसाचे क्रेडीट हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी होईपावेतो मागील मंजुर दराने, मंजुर पंपधारकांकडून संस्थानचे विविध विभागारीता खरेदी करण्यात आलेल्या इंधनाची बीले पुर्वीप्रमाणेच आदा करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

१३ **हमाली कामाचे दरपत्रक उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशने विभागामार्फत प्रकाशित पुस्तके/फोटो, सीडी, दैनंदिनी/ दिनदर्शिका मध्यवर्ती भांडार विभागातून संस्थान वाहनात भरणे ते प्रकाशने विभागाकडे सबस्टोअरमध्ये व बुकस्टॉलला उतरुन घेणे याकामी जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/३७१/२०१६ दि.२७.०४.२०१६ खालीलप्रमाणे हमाली कामासंबंधीत मसुदयाची प्रसिध्दी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व नगरपंचायत शिर्डी या सार्वजनिक नोटीस बोर्डावर लावणेत आली असून त्यानुसार खालील प्रमाणे पाच (५) दरपत्रके प्राप्त झाली आहे.

| अ.नं. | हमाल धारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.बापू वसंत गोरसे | १५५८ | ३०.०४.२०१६ |
| ०२ | श्री.दत्तु भासकर मोरे | १८५९ | ३०.०४.२०१६ |
| ०३ | श्री.भाऊराव मच्छिंद्र पिंपळे | १८६० | ३०.०४.२०१६ |
| ०४ | श्री.महादेव तारकु नांगरे | १८६१ | ३०.०४.२०१६ |
| ०५ | श्री.किसन वाल्मीक गाढे | १८६२ | ३०.०४.२०१६ |

हमाली व वाराईकामी वरीलप्रमाणे प्राप्त 05 दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील मुळ दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री.किसन वाल्मीक गाढे | ३०/- |
| ०२ | श्री.दत्तु भासकर मोरे | ५४/- |
| ०३ | श्री.भाऊराव मच्छिंद्र पिंपळे | ४४/- |
| ०४ | श्री.बापू वसंत गोरसे | ३७/- |
| ०५ | श्री.महादेव तारकु नांगरे | ४७/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रकाशने विभागामार्फत प्रकाशित पुस्तके/फोटो, सीडी, दैनंदिनी/ दिनदर्शिका मध्यवर्ती भांडार विभागातून संस्थान वाहनात भरणे ते प्रकाशने विभागाकडे सबस्टोअरमध्ये व बुकस्टॉलला उतरुन घेणे या हमाली व वाराईकामी श्री.किसन वाल्मीक गाढे यांचे प्रती क्विंटल रु.३०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

१४ **सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात ए.सी. प्लांट बसविणेकामी प्राप्त ई-निविदाचे कर्मशियल बीड उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 24/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 162(35) अन्वये सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात ए.सी. प्लांट बसविणेकामी 6000 CFM क्षमतेचा AHU व डक्टींग खरेदी करणेस तसेच कॉपर पाईप, गॅस वापरुन यंत्रणेची उभारणी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस, त्याचप्रमाणे संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व याकामी येणा-या रुपये 6,50,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर दि. 08/12/2015 रोजी अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा डाऊनलोड कालावधी दि. 10/12/2015 ते 17/12/2015 अशा ठेवणेत आला होता. सदर कालावधीमध्ये फक्त दोन पुरवठादार यांचेकडून ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. यासाठी कमीत कमी तीन ई-निविदा प्राप्त होणे आवश्यक होते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर ई निविदा नोटीस अपलोड करुन फेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदा डाऊनलोड कालावधी दि. 02/03/2016 ते 10/03/2016 अशा ठेवणेत आला होता. त्यानुसार खालील तीन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1) कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई- 400 037.
2) कुल ब्रीज, पुणे
3) क्लासिक कुल एअरकंडीशनींग, मुंबई

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 06/04/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त तिन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात ए.सी. प्लांट बसविणेकामी 6000 CFM क्षमतेचा AHU व डक्टींग खरेदी करणेस तसेच कॉपर पाईप, गॅस वापरुन यंत्रणेची उभारणी करणेकामी प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 1. | क्लासिक कुल एअरकंडीशनींग, मुंबई | ५,३६,४६०/- |
| 2. | कुल ब्रीज, पुणे | ४,६३,३९४/- |
| 3. | कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई | ४,८७,०३५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल कक्षात ए.सी. प्लांट बसविणेकामी कुल ब्रीज, पुणे यांचे रु.४,६३,३९४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१५ **श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS-II-OT च्या सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेकामी प्राप्त ई-निविदाचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 24/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 162(34) अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये CVTS-II-OT करीता 4000 CFM चा एक A.H.U. व 5.5 टनाचे दोन Condensing Unit खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस, त्याचप्रमाणे संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व याकामी येणा-या रुपये 6,50,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर दि.08/12/2015 रोजी अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा डाऊनलोड कालावधी दि. 10/12/2015 ते 17/12/2015 अशा ठेवणेत आला होता. सदर कालावधीमध्ये फक्त दोन पुरवठादार यांचेकडून ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. यासाठी कमीत कमी तीन ई-निविदा प्राप्त होणे आवश्यक होते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर ई निविदा नोटीस अपलोड करुन फेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदा डाऊनलोड कालावधी दि. 02/03/2016 ते 10/03/2016 अशा ठेवणेत आला होता. त्यानुसार खालील तीन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

(1) कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई- 400 037.

(2) कुल ब्रीज, पुणे

(3) क्लासिक कुल एअरकंडीशनींग, मुंबई

उपरोक्त प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 06/04/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त तिन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये CVTS-II-OT करीता 4000 CFM चा एक A.H.U. व 5.5 टनाचे दोन Condensing Unit खरेदी करणेकामी प्राप्त व पात्र 03 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई | ५,९४,६२५/- |
| 2. | क्लासिक कुल एअरकंडीशनींग, मुंबई | ६,६१,८००/- |
| 3. | कुल ब्रीज, पुणे | ५,१७,०१०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS-II-OT च्या सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेकामी कुल ब्रीज, पुणे यांचे रु.५,१७,०१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **लोक सहभागातुन गंगापुर धरणातून गाळ काढणेस आर्थिक मदतीबाबत.**

**प्रस्ताव-** प.पु.श्री.श्री.रविशंकरजी संस्थापित आर्ट ऑफ लिव्हींग संस्था, नाशिक यांनी त्यांचे दि.१६.०४.२०१६ चे पत्रात, "नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद जालना या जिल्हयांना मुख्यत्वे पाणी पुरवठा गंगापूर धरणातून होत असतो. गंगापूर धरण बांधून सुमारे ६५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. या धरणात मोठया प्रमाणात गाळ साचल्याने दिवसेंदिवस पाणी साठवण क्षमता कमी झालेली आहे. प.पु.श्री.श्री.रविशंकरजी संस्थापित आर्ट ऑफ लिव्हींग या संस्थेने धरणातील गाळ काढयाचे काम लोकसहभागातून करण्याचा संकल्प केलेला आहे. धरणातून अंदाजे ४ लक्ष घन मीटर इतका गाळ काढयाचे नियोजन संस्थेने केलेले आहे. या कामासाठी १५-२० पोकलॅण्ड मशीन, १०० ट्रक्स, १५०-२०० ट्रॅक्टर्स यांचे नियोजन केलेले आहे. ४ लक्ष घन मीटर इतका गाळ काढल्याने पाण्याचा साठा साधारण १५ द.ल.घ.फुट इतका वाढणार आहे. यासाठी अंदाजे एक ते दिड कोटी खर्च होणार आहे. या कामासाठी संस्थानने भरघोस मदत करुन काम पुर्णत्वास नेण्यास आर्थिक मदत करावी," असे नमुद केलेले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१) (१क) "भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक, व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायांभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडाळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्ट्या विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**विभागाचा अभिप्रायः-** मे-२०१५ मध्ये श्री साईबाबा संस्थानकडून महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्हयांना संबंधीत जिल्हयांचे मा.जिल्हाधिकारी यांचे नांवे प्रत्येकी एक कोट रुपये जलयुक्त शिवार अभियान योजना राबविणेसाठी दिलेले आहेत.

वेगवेगळया जिल्हयांमधुन सामाजिक संस्था, ग्रामपंचायती यांचेकडूनही पावसाळयातील पाणी अडवून साठविणेसाठी ओढे-नाले यांना बंधारे बांधणे, गाळ काढणे या कामासाठी निधी मागणीचे प्रस्ताव आलेले आहेत.

प.पु.श्री.श्री.रविशंकरजी संस्थापित आर्ट ऑफ लिव्हींग संस्था, नाशिक या संस्थेने, गंगापूर धरणातून गाळ काढणेचे कामाचा संकल्प केलेला आहे. या खर्चासाठी INTERNATIONAL ASSOCIATION FOR HUMAN VALUES या नांवाने आर्थिक मदत मिळणेची विनंती केलेली आहे. सदर प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

निर्णय क्र.३०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता, प.पु.श्री.श्री.रविशंकरजी संस्थापित आर्ट ऑफ लिव्हींग संस्था, नाशिक या संस्थेस गंगापूर धरणातून गाळ काढणेचे कामास आर्थिक मदत देणे उचित होणार नाही, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.०४ **आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये होणा-या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तु केवळ राष्ट्रीयकृत बँकेत किंवा बँकामध्ये ठेव म्हणुन ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्यां खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील, अशी तरतुद आहे.

मा.व्य.स.निर्णय क्र.९५२/दि.६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन त्यांचेकडुन व्याजदर मागवुन जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बँकांकडे टप्याटप्याने गुंतवणुक करण्यास मान्यता येऊन मा. कार्यकरी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणुक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी समिती सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरून राष्टीयकृत बँकाची आर्थिक् स्थिती पाहून केलेल्या गुंतवणुकांची मुदतपूर्ती झाल्यानंतर उपलब्ध् होणारा निधी व बचत खात्यामध्ये दैनदिन खर्च वजा जाता उपलब्ध् होणारा निधी व बचत खात्यामध्ये दैनंदिन खर्च वजा जाता उपलब्ध् होणारा निधी याची विहित पध्दतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकामध्ये कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणुक करण्यात आली आहे. दि.३१ मार्च २०१६ अखेर आर्थिक वर्षात असलेल्या गुंतवणुकीचा अहवाल खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | बँकेचे नाव | दि.३१ मार्च २०१६ अखेर मिळालेले व्याज | दि. ३१ मार्च २०१६ अखेर असलेली गुंतवणुक |
|---|---|---|---|
| १ | आंध्र बँक, शिर्डी | ३,७९,६२,२७५ | ३,१९,८५,३४,९९६ |
| २ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | ५,६१,०३,८९० | १,१३,००,००,००१ |
| ३ | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | - | १,०३,२४,९९,९९७ |
| ४ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ८,५०,७४,३०६ | १,४२,५०,००,०१२ |
| ५ | कॅनरा बँक, शिर्डी | १२,८७,९१,४१९ | ५२,४९,९९,९९४ |
| ६ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ७,२३,५८,०४२ | १,७१,१४,८७,२५८ |
| ७ | कॉर्पोरेशन बँक, शिर्डी | ४,०३,५२,९५३ | १९,९९,९९,९९९ |
| ८ | देना बँक, शिर्डी | २,५४,७४,०१८ | ८५,००,००,००० |
| ९ | इंडियन बँक, शिर्डी | ३,१३,६५,०९० | ३५,९९,९९,९९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी | ६३,७६,९६९ | १३,२५,००,००० |
| ११ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | ३५,६५,७७,३९० | १,०५,५०,००,००५ |
| १२ | युको बँक, शिर्डी | २,००,०८,३०२ | ६७,९९,९९,९९१ |
| १३ | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १,१०,०९,४०४ | ८८,५०,००,००२ |
| १४ | विजया बँक, शिर्डी | ४१,९०,३५,४०८ | २,६५,५०,००,००९ |
| | **एकूण रक्कम** | **१,२९,०४,८९,४६६/-** | **१५,८४,००,२२,२५८/-** |

अशाप्रकारे आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये राष्ट्रीयकृत बँकाकडुन व्याजदर मागवुन केलेली गुंतवणुक दि.३१ मार्च २०१६ अखेर रू.१५,८४,००,२२,२५८/- इतकी असुन व गुंतवणुकीवर व्याजरुपाने मिळालेले उत्पन्न रू.१,२९,०४,८९,४६६/- इतके आहे. या वर्षात राष्ट्रीयकृत बँकानी ७.२५% ते ८.८०% इतका व्याजदर दिलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास व आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची विहित पध्दतीने मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयकृत बँकामध्ये वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवुन जास्तीत जास्त व्याजदराने गुंतवणुक करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये केलेल्या प्रस्तावित गुंतवणुक अहवालाची नोंद घेण्यात आली व आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये विहीत पध्दतीने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.०५ **आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) व पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूकीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविकः-** मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२८.११.२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५६३ अन्वये आर्थिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ संस्थानसाठी अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) नेमणुक करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येवुन, नामांकित (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षकांना बंद पाकिटामध्ये त्यांचे फीसह अर्ज करण्यासाठी आवाहन करणेत यावे. तसेच मुदतीमध्ये आलेल्या अर्जांची उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ त्रीसदस्सीय समिती सभेपुढे सादर करणेत यावा. असा निर्णय संमत झाला होता.

तसेच पुर्व लेखापरिक्षक यांचीही मुदत दि.३१ मार्च,२०१६ अखेर संपल्याने त्यांनी, पुढे पुर्वलेखापरिक्षणाचे कामकाजास असमर्थता दर्शविली त्यास अनुसरुन दि.०७/०३/२०१६ ते दि.१२/०३/२०१६ पर्यंत संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर अंतर्गत लेखापरिक्षक व पुर्व लेखापरिक्षक नेमणुकी करीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दि.१२.०३.२०१६ अखेर एकुण १८ सिलबंद पाकिटे प्राप्त झाली. मा.व्य.स.निर्णय क्र.५६३ अनुसार दि.२०.०४.२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे छाननी करण्यात आली असुन, त्यातील पात्र लेखापरिक्षकांच्या फी चा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| अ.नं. | लेखापरिक्षण संस्थेचे नाव | पुर्व लेखापरिक्षण – संस्थान, फी रु. | अंतर्गत लेखापरिक्षण – संस्थान, फी रु. | पुर्व लेखापरिक्षण – रुग्णालय, फी रु. | अंतर्गत लेखापरिक्षण - रुग्णालय फी रु. | रुग्णालय - राजीव गांधी योजना लेखापरिक्षण फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | के.के.एस.एस.अॅन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस पुणे | १,००,००० | १,४०,००० | १,००,००० | १,४०,००० | १,००,००० |
| २ | एस.पी.ए.वाय.अॅन्ड कं चार्टर्ड अकौटंटस. पुणे | १,२०,००० | २,००,००० | १,२०,००० | २,००,००० | २५,००० |
| ३ | एम.ए.पी.एस.व्ही. अॅन्ड असो चार्टर्ड अकौटंटस. नासिक | १,३८,००० | ५७,००० | १,३८,००० | ५७,००० | ५९,४०० |
| ४ | उल्हास बोरसे अॅन्ड कं. नासिक | १,४९,५०० | १,७०,००० | १,४५,५०० | १,६९,००० | १,२०,००० |
| ५ | कनकिया अॅन्ड मेहता असो. अहमदनगर | १,६५,६०० | १,७२,५०० | १,६५,६०० | १,८४,००० | ६९,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | व्ही.पी.शिंदे अॅन्ड कं.औरंगाबाद | १,७२,५०० | ११,५०,००० | ११,५०,००० | ११,५०,००० | ५,७५,००० |
| ७ | जयेश देसले अॅन्ड कं. नासिक | १,७४,८०० | १,९७,८०० | १,६९,०५० | १,९५,५०० | १,४०,३०० |
| ८ | आर.पी.डी. असोसिएट्स, नासिक | १,८०,००० | ३,००,००० | १,८०,००० | ३,००,००० | ३,००,००० |
| ९ | एस.जी.अंदाणी अॅन्ड कं. अहमदनगर | १,८०,००० | २,७०,००० | १,८०,००० | २,५०,००० | १,००,००० |
| १० | ए.डी.अंजीकर अॅन्ड कं. मुंबई | १,८०,००० | १,८०,००० | १,८०,००० | १,८०,००० | १,८०,००० |
| ११ | ए.एस.बेदमुथा नासिक | २,०७,००० | ३,४५,००० | २,०७,००० | ३,४५,००० | १,५५,२५० |
| १२ | पाटील हिरण जाजू अॅन्ड कं. नासिक | २,३९,००० | २,३९,००० | १,८५,८०० | १,८५,८०० | ५०,४०० |
| १३ | मे.के.के.चाणाणी अॅन्ड कं. मुंबई | २,७४,२७५ | २,७४,२७५ | ४,१५,७२५ | २,७४,२७५ | १,५६,९७५ |
| १४ | मे.एस.एस.ए.ए.एम अॅन्ड कं. राहूरी | ३,५०,००० | ४,५०,००० | ३,००,००० | ४,००,००० | २,५०,००० |
| १५ | मे.गोगटे अॅन्ड कं. पुणे | ४,०२,५०० | ४,०२,५०० | १,७२,५०० | २,८७,५०० | ३,४५,००० |
| १६ | मे.व्ही.व्ही.कोठारी अॅन्ड कं. श्रीरामपुर | ५,००,००० | NA | ४,५०,००० | NA | NA |
| १७ | एस.जी.मुंदडा अॅन्ड कं. | १३,८०,००० | १३,८०,००० | १३,८०,००० | १३,८०,००० | १३,८०,००० |
| १८ | पंकज एन.शर्मा लातुर | NA | १,२०,०५१ | NA | १,२०,०५१ | NA |

कमीत कमी मानधनाची मागणी व अनुभवाची पात्रता पुर्ण करणा-या लेखापरिक्षण संस्थांना प्रत्यक्ष कामाचा आवाका पाहुन काम करण्यास तयार असलेबाबत संमतीपत्राची मागणी करण्यात आली होती. न्युनतम फी नमुद करणा-या खालील लेखापरिक्षण संस्थानी नमुद केलेल्या फी वर लेखापरिक्षण करण्यास लेखी संमतीपत्र दिले आहे. त्यास अनुसरुन त्यांना व आवश्यकते नुसार असमर्थता दर्शविल्यास चढत्या फी प्रमाणे त्यानंतरच्या लेखापरिक्षण संस्थेस विचारणा करुन, लेखापरिक्षक म्हणुन नेमता येईल.

| अ.क्र. | लेखापिरीक्षण संस्थेचे नाव | लेखापरिक्षण कामकाज | प्रति वर्ष फी रु. (सर्व करांसह) |
|---|---|---|---|
| १ | केकेएसएस.अॅन्ड असो. चाटर्ड अकौटंटस पुणे | पुर्व लेखापरिक्षक -संस्थान<br>पुर्व लेखापरिक्षक –रुग्णालये विभाग | १,००,०००/-<br>१,००,०००/- |
| २. | एमएपीएसव्ही. अॅन्ड असो. चाटर्ड अकौटंटस नासिक | अंतर्गत लेखापरिक्षक -संस्थान<br>अंतर्गत लेखापरिक्षक - रुग्णालये विभाग | ५७,०००/-<br>५७,०००/- |
| ३. | एसपीएवाय. अॅन्ड कं. चाटर्ड अकौटंटस पुणे | राजीव गांधी योजना- रुग्णालये विभाग | २५,०००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थांस लेखापरिक्षक म्हणुन आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता व पुढील आदेश होईपर्यंत नियुक्ती आदेश देण्यास व त्यांनी असमर्थता दर्शविल्यास त्यानंतरच्या न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थांस नियुक्ती आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.३१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थांस लेखापरिक्षक म्हणुन आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता व पुढील आदेश होईपर्यंत नियुक्ती आदेश देण्यास व त्यांनी असमर्थता दर्शविल्यास त्यानंतरच्या न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थांस नियुक्ती आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.०६ **एअर इंडियाच्या विमानाने येणा-या साईभक्तांसाठी बोर्डींग पासवर व्हि.आय.पी. श्री साईबाबा दर्शनाची सुविधा सुरु करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती

उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** – निरंक

**प्रस्ताविक**– मा.खा.हेमंत गोडसे यांनी त्यांचे दिनांक १४.०४.२०१६ रोजीचे पत्रात, " उपरोक्त विषयान्वये दि.१ मे २०१६ पासून मुंबई नाशिक (ओझर) विमानसेवा सुरु होणार आहे. यापुर्वी देखिल विमानसेवा सुरु होवून काही कालावधीतच ही सेवा खंडीत झाली होती. आता नव्याने मी पाठपुरावा करुन एअर इंडीयाची विमानसेवा सुरु करणेबाबत प्रयत्न केले असून दि.०१ मे २०१६ पासून ही विमानसेवा सुरु होणार आहे. या विमानसेवेचा जास्तीतजास्त प्रसार प्रचार होणे अत्यंत आवश्यक आहे त्यादृष्टीने मी आणांस कळवू इच्छितो की वैष्णवदेवी माता येथे विमानाने येणा-या भाविकांसाठी तेथील संस्थानने प्रवाशांच्या बोर्डींगपासवर व्हि.आय.पी दर्शनाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. याचा खुप मोठा फायदाया भक्तांना होत असतो व त्यामुळे विमानप्रवासात देखील वाढ होताना दिसते. तशाच प्रकारची सेवा आपण आपल्या श्री साईबाबा संस्थान साठी लागू करावी. कारण संपुर्ण जगभरात श्री साईबाबांचे असंख्य भक्त आहेत अनेक भक्त विविध मार्गाने श्री साईबाबांच्या समाधी दर्शनसाठी येत असतात. एअर इंडीयाची मुंबई-नाशिक विमान सेवा सुरु होणार आहे. या विमान प्रवासाच्या बोर्डींग पासवर व्ही.आय.पी दर्शन पास सुविधा सुरु करण्याचे आदेश संबंधीत यंत्रणेस द्यावेत असे झाल्यास याचा नक्कीच मोठा फायदा साईभक्तांना होईल तसेच विमानप्रवाशांची सुध्दा संख्या वाढण्यास मदत होईल. या बोर्डींगपासवर आपल्या संस्थाच्या नियमानुसार थोडया प्रमाणात शुल्क जरी आकारले तरी त्याबाबत काही हरकत राहणार नाही. तरी वरील बाबींचा विचार करुन एअर इंडियाच्या विमानाने येणा-या साईभक्तांसाठी बोर्डींगपासवर व्हि.आय.पी साई दर्शनाची सुविधा सुरु करावी ही विनंती" असे कळविले आहे.

मा.खा.हेमंत गोडसे यांनी एअर इंडियाच्या दि १ मे, २०१६ पासुन सुरु होत असलेल्या मुंबई-नाशिक (ओझर) विमानाने प्रवास करणा-या साईभक्तांना विमान प्रवासाच्या बोर्डींगपासवर संस्थानच्या नियमानुसार थोडया प्रमाणावर शुल्क आकारुन श्री साईबाबांचे व्ही.आय.पी दर्शन पास सुविधा सुरु करणेबाबत कळविलेले आहे.

तथापि, व्हीआयपी दर्शन/आरती पासेस वितरणाबाबत मा.व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

१) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२.०३.२०१५ चे सभेतील निर्णय क्र. ८३ अन्वये दिनांक ०१.०४.२०१५ पासून जनसंपर्क विभागामार्फत व्ही.आय.पी.व्यक्तींकरीता देण्यात येणारे दर्शन पास प्रायोगिक तत्वावर आठवडयातील सातही दिवस शनिवार, रविवारच्या धर्तीवर सध्याच्या प्रचलित पध्दतीने देणगी शुल्क आकारणेत येऊन वितरीत करणेबाबत निर्णय झालेला आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२१ अन्वये दर्शन पासेससाठी रुपये २००/-, काकड आरतीसाठी रुपये ६००/- व इतर आरत्यांसाठी रुपये ४००/- प्रतिव्यक्ती याप्रमाणे दर्शन/ आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करण्यसत आलेली आहे.

**मागणी**– एअर इंडियाचे विमानाने येणा-या साईभक्तांसाठी बोर्डीगपासवर व्ही.आय.पी श्री साईबाबा दर्शनपासची सुविधा सुरु करणेबाबत.

**अनुमान** - मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**– संस्थानचे www.sai.org.in या संकेतस्थळावर दर्शन आरतीपास सुविधा सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागाचे पासेस वितरण काऊंटरवरुन महत्वाच्या/अतिमहात्वाच्या व्यक्ती तसेच राज्यशासनाच्या विविध विभागांचे सचिव/वरिष्ठ अधिकारी, मा.आय.ए.एस., मा.आय.पी.एस., मा.आय.आर.एस., मा.आय.एफ.एस.व तत्सम, त्याचप्रमाणे सिनीयर कमिशन्ड मिलीटरी ऑफीसर्स देणगीदार साईभक्त आदींची दर्शन पास व्यवस्था केली जात आहे. तथापि, औरंगाबाद तसेच पूणे येथे विमानप्रवास करुन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांनी व्ही.आय.पी दर्शन पास मिळणेबाबत मौखिक विनंती केलेली आहे. तसेच काकडी येथील शिर्डी विमानतळाचे काम प्रगतीपथावर असून भविष्यात त्यांचेकडूनही अशा प्रकारची मागणी नाकारता येत नाही. सबब मा.खा.हेमंत गोडसे यांचे दिनांक १४.०४.२०१६ रोजीचे पत्रान्वये एअर इंडियाच्या दि.१ मे, २०१६ पासुन सुरु होत असलेल्या मुंबई-नाशिक (ओझर) विमानाने प्रवास करणा-या साईभक्तांना विमान प्रवासाच्या बोर्डीगपासवर व्ही.आय.पी पास देणेबाबतचा विषय धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन/ आरतीचे व्ही.आय.पी. पासेस संस्थानने सर्व साईभक्तांकरीता संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे एअर इंडियाचे विमानाने येणा-या साईभक्तांसाठी बोर्डीगपासवर व्ही.आय.पी. दर्शनपास उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०७** **श्री.टी.सुब्बारेड्डी, सिकंदराबाद यांचे निर्देश वजा सुचना पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**- महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व

कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक -** दिनांक १४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०७

**प्रस्ताविक-** उपरोक्त संदर्भीय पत्रामध्ये श्री.टी.सुब्बारेड्डी, सिंकदराबाद हे साईभक्त दिनांक २५ जानेवारी २०१६ रोजी शिर्डी येथे दर्शनासाठी आले असतांना त्यांना आलेल्या आडचणीबाबत त्यांनी सदरचे पत्रामध्ये सुचना वजा निर्देश दिलेले आहेत. यामध्ये जनसंपर्क विभागाशी निगडीत असलेला मुद्दा, Senior Citizens are directly allowed in the Samadhi mandir with payment of any donation of Rs.100/- each. Why don't you extend this free facility to Senior Citizens.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ रोजीचे सभेत "साईदर्शनासाठी येणारे अंध, मतिमंद व अशा प्रकारचे अपंग अथवा अतिवृध्द की जे स्वतः ची देखभाल करणेस असमर्थ आहेत, अशा साईभक्तांची फक्त दर्शन व्यवस्था मोफत करणेत यावी." असा निर्णय झालेला आहे. मात्र या निर्णयामाध्ये सिनियर सिटीझन (६५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय) व्यक्तींची दर्शन व्यवस्था मोफत करणेबाबत उल्लेख नाही.

याबाबत आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थानचे संकेतस्थळावरुन माहिति घेतली असता अशा विशेष दर्शनाची व्यवस्था शारीरीक दृष्टया अपंग व वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असणा-या व्यक्तींची वय वर्षे ६५ असलेबाबतचा पुरावा व अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र बघून स्वतंत्र दर्शन गेटने सकाळी १०.०० वाजता आणि दुपारी ०३.०० वाजता मंदिराचे मुख्य दर्शन प्रवेशव्दारातून व्यवस्था करण्यात येते. याकरीता संबंधीतांनी दोन तास आधी आय.डी.कार्डसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासाठीची पात्रता खालीलप्रमाणे-

१) ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त आहेत अशा व्यक्तींना सिनियर सिटीझन समजण्यात येऊन त्यांना या गेटने दर्शनासाठी सोडण्यात येईल.

२) फिजीकल चेंज व्यक्तींही या गेटने जाऊ शकतील.

३) नव-याचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त असेल व बायकोचे वय ६५ वर्षापेक्षा कमी असेल तर दोघेही दर्शनास जाऊ शकतील.

४) प्रमुख आरोग्य समसूया असल्यास तसे डॉक्टरांचे प्रमाणपत्र दाखवून या गेटने जाऊ शकतील.

अशी माहिती उपलब्ध झाली असून याबाबत तिरुपती देवस्थाकडे या व्यक्तींची दर्शन व्यवस्था कोणत्या प्रकारे करतात याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा केली असता उपरोक्त व्यक्तींची वरीलप्रमाणे दर्शनाची मोफत व्यवस्था करण्यात येते असे सांगितले आहे.

**मागणी–** सिनियर सिटीझन व्यक्ती जनसंपर्क विभागाचे पासेस काऊंटरवर पास घेण्यासाठी आल्यानंतर पासेसचे शुल्क देतांना नेहमीच वाद घालतात. तरी त्यांची फक्त दर्शनाची मोफत व्यवस्था सध्या अंध, अपंग अथवा अतिवयोवृध्द व्यक्तींना ज्या गेटने दर्शनासाठी मोफत सोडण्यात येते त्या गेटने करता येईल. या गेटवर कर्तव्यावर असणारे संरक्षण विभागाचे कर्मचारी वयाचा पुरावा अथवा डॉक्टरांचे प्रमाणपत्र असलेबाबत खात्री करुन अशा व्यक्तींना समाधी मंदिरात होणा-या आरत्यांच्या वेळे व्यतिरिक्त दर्शनासाठी सोडतील. तसेच मान्यतेअंती याबाबतची माहिती संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** तरी सिनियर सिटीझन (६५ वर्षा पेक्षा जास्त वय असणा-या) व्यक्तींची तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर मोफत दर्शन व्यवस्था खालीलप्रमाणे करता येईल असे मत आहे.

१) ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त आहेत अशा व्यक्तींना सिनियर सिटीझन समजण्यात येऊन त्यांना या गेटने दर्शनासाठी सोडण्यात येईल. (वयाचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)

२) नव-याचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त असेल व बायकोचे वय ६५ वर्षापेक्षा कमी असेल तर दोघेही दर्शनास जाऊ शकतील. (वयाचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)

३) प्रमुख आरोग्य समस्या असल्यास अशा व्यक्ती डॉक्टरांचे प्रमाणपत्र दाखवून या गेटने जाऊ शकतील. (आवश्यक पुरावा सादर करावा लागेल.)

तथापि, सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, एका दिवसामध्ये किती जेष्ठ नागरीक दर्शनासाठी येतात, तसेच विनापास दर्शनास सोडण्यासाठी प्रमुख आरोग्य समस्या कोणत्या या सर्व बाबींसह अभ्यासपूर्वक फेरप्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०८** **बांधकाम प्रगती अहवाल अ व ब तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

बांधकाम प्रगती अहवालाचा तक्ता अ व बांधकाम ठेकेदारांची अंतीम बीले अदा करणेबाबतचा तक्ता ब यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेमध्ये पुरविणेत आल्या होत्या.

निर्णय क्र.३१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त बांधकाम प्रगती अहवाल अ व ब तक्तयासंदर्भात मा.कार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम विभागाचे अधिकारी, बांधकाम ठेकेदार तसेच शासनाच्या भू-संपादन कक्षाचे अधिकारी अशा सर्व संबंधीतांसह स्वतंत्र सभा घेण्यात यावी व त्या सभेचा अहवाल त्रीसदस्य समिती सभेसमोर सादर करावा.**

**तसेच बांधकाम प्रगती अहवालाच्या अ तक्त्यामधील कामास मागील सभेमध्ये मंजूरी मिळाल्यानंतर चालू सभेपर्यंत कामाची किती प्रगती झाली आहे, याची थोडक्यात माहिती सादर करावी.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.०९ **श्री रामनवमी उत्सव- २०१६ निमित्त शिर्डी ग्रामस्थांनी सुचविलेल्या सुचनांनुसार स्टेज व स्वागत कमानी उभारणी करणेकामी आलेले खर्चाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये " रुढी प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

तसेच, अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणेतेही धार्मिक कार्य किंवा सामारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** दिनांक १४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ अखेर ०३ दिवस श्रीरामनवमी उत्सव साजरा करणेत येणार असलेने, दि.२८/०३/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. लेडीबाग येथील सभागृहात शिर्डी ग्रामस्थ यांचे तर्फे श्रीरामनवमी उत्सव-२०१६ निमीत्ताने विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेच्या वेळी शिर्डी ग्रामस्थांनी श्रीरामनवमी उत्सव-२०१६ निमीत्त शिर्डी गावामध्ये येणा-या साई पालख्यांचे स्वागत करण्यासाठी पालखी मार्गावर बॉक्स स्वागत कमानींची उभारणी तसेच संस्थानमार्फत निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रमासाठी उभारण्यात येणारे स्टेज दि.१७/०४/२०१६ ते दि.२०/०४/२०१६ पर्यंत ठेवण्यात यावे. असे सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-५ यांनी त्यांचेकडील दि.२८/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्ताव :-** सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-५ यांचे इतिवृत्तामध्ये नमूद केलेनुसार श्रीरामनवमी उत्सव-२०१६ निमीत्ताने शिर्डी ग्रामस्थांचे सूचनेनुसार उत्सव कालावधीमध्ये शिर्डी गावामध्ये येणा-या साई पालख्यांचे स्वागत करण्यासाठी कनकुरी रोड, पिंपळवाडी रोड, दर्शनरांग प्रवेशद्वाराजवळ, नांदुर्खी रोड व साईनगरकडे जाणारा रस्ता येथे बॉक्स टाईप स्वागत कमानी उभारणे तसेच शिर्डी ग्रामस्थांचे वतीने आयोजित सांस्कृतीक कार्यक्रमासाठी साईनगर मैदानावर ४०'x२०' साईजचे स्टेज व अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस दि.०५/०४/२०१६ अन्वये मान्यता घेऊन, याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरची व्यवस्था करुन घेणेत आली असून, याकामी खालील प्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीरामनवमी उत्सवानिमीत्त कनकुरी रोड, पिंपळवाडी रोड, दर्शनरांग प्रवेशद्वाराजवळ, नांदुर्खी रोड व साईनगरकडे जाणारा रस्ता येथे बॉक्स टाईप **स्वागत कमानी उभारणे.** साईज: रुंदी २५' उंची २०' = ०५ नग (कालावधी दि.१४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ अखेर ०३ दिवस) | ०५ नग | १०००/- प्र. दि. प्र. नग | १५,०००/- |
| ०२. | सदरहू स्टेजवर **नृत्य व इतर सांस्कृतीक कला सादर** करणेकामी कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज ॲंगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबुत सपोर्ट देऊन ४०'x२०' साईजचे स्टेज तयार करणे., तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी एकाच रंगाचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे. तसेच स्टेजचे पुढील बाजूने ०२ ठिकाणी स्पीकर ठेवणेसाठी ६'x६' चे प्लॅटफॉर्म तयार करणे व स्टेजचे समोर ४' उंचीचे १५० रनिंग फुट बॅरेकेटींग करणे इ. सह स्टेज व्यवस्था करणे. (कालावधी दि.दि.१७/०४/२०१६ ते दि.१९/०४/२०१६ अखेर ०३ **दिवस**) **स्टेज साईज : ४०'x२०'= ८०० चौ. फुट** | ८०० चौ. फुट | १८/- प्र. दि. प्र. चौ. फुट | ४३२००/- |
| | | | एकुण रुपये (०१+०२).. | ५८,२००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे श्रीरामनवमी उत्सव-२०१६ मध्ये सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-५ यांचे आदेशानुसार वर नमूद केलेनुसार स्वागत कमानी व स्टेज व्यवस्था करुन घेणेकामी आलेले रु.५८,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१६ निमित्त शिर्डी ग्रामस्थांनी सुचविलेल्या सुचनांनुसार स्टेज व स्वागत कमानी उभारणी करणेकामी आलेल्या रु.५८,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१० **सन- २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडपव्यवस्था करणेकामी केलेल्या कार्यवाहीबाबत.**

प्रस्ताव- उन्हाळा सुट्टीचे कालावधीमध्ये शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय परिसर, भक्तनिवास (५०० रुम) परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप व्यवस्था करणे आवश्यक असल्याने, याकामी दि.०१/०२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई- निविदामधील टेक्नीकल बीड दि.२१/०३/२०१६ रोजी उघडणेत आले व पात्र ठेकेदारांच्या ई- निविदामधील कमर्शियल बीड दि२९/०३/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत उघडणेत आले होते. सदरहू ई- निविदांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना ६० दिवसाचे कालावधीसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी सदरहू ठेकेदार यांनी देऊ केलेल्या सवलतीचे दरानुसार येणारे अपेक्षीत रक्कम रु.९,८१,१३६/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीपुढे चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावास मा. अध्यक्ष सो. यांनी दि. ०९/०४/२०१६ रोजी मान्यता दिलेली असून त्याचबरोबर सदर प्रस्तावाचे टिपणीवर खालील प्रमाणे आदेश दिलेला आहे.

*"E.O. to Call explanation from the concern official for delaying the process of Mandap & causing inconvenience to the devotees & those explanations of all be placed before the Committee"*

मा.अध्यक्ष सो. यांचे वर नमूद आदेशान्वये इकडील विभागाचा खुलासा खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे. मंडप व्यवस्था करणेकामी इकडील विभागामार्फत करणेत आलेल्या कार्यवाहीचा घटनाक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | दिनांक | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| ०१ | २५/१२/२०१५ | सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला. |
| ०२ | ०६/०१/२०१६ | दि.२५/१२/२०१५ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेनंतर मा. उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज दाखल करता येईल. तथापी सदरहू काम कालमर्यादेचे असल्याने दरम्यानचे कालावधीत निविदा प्रक्रिया राबविणेसाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे ई – निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यासाठी निविदा सुचना प्रसिध्द करणेस मान्यतेस्तव टिपणी फेर सादर करण्यात आली. |
| ०३ | ०८/०१/२०१६ | सदरचे फेर सादर प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रथम मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी. तसेच मा. समितीसमोर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणा-या मंडपावर वार्षिक खर्च सादर करावा. तसेच Permenant Structure उभारण्याबाबतचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश व त्यावर पुढील कार्यवाही काय करावी याबाबतच्या मार्गदर्शनासाठी सविस्तर टिपणी सादर करावी असे निर्देश दिले. |
| ०४ | ०१/०२/२०१६ | सन २०१४ व सन २०१५ या वर्षांमध्ये संस्थानमार्फत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी झालेल्या खर्चाचे तपशिलासह टिपणी सादर करणेत आली. तसेच याकामासाठी निविदा सूचना प्रसिध्द करुन ई – निविदा प्रक्रीयेद्वारे निविदा मागविणेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर दि.१३/०२/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी झाली. |
| ०५ | १३/०२/२०१६ | प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी. |
| ०६ | १८/०२/२०१६ | वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचे जाहीरातीच्या मसुदयावर मा.कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी. |
| ०७ | २९/०२/२०१६ | मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.१८८ अन्वये खर्चास मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस मान्यता. |
| ०८ | ०२/०३/२०१६ | ई – निविदा मागविणेसाठी निविदा सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द. |
| ०९ | २१/०३/२०१६ | तांत्रिक लिफाफा ( टेक्नीकल बीड) उघडले. |
| १० | २९/०३/२०१६ | मा. उपसमिती सभेत कमर्शिअल बीड उघडले. |
| ११ | ०१/०४/२०१६ | उन्हाळी मंडप व्यवस्थेकामी उघडण्यात आलेल्या ई- निविदांबाबत सभाकामकाज विभागाकडे टिपणी सादर. |

| | | |
|---|---|---|
| १२ | ०९/०४/२०१६ | सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी ई – निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार न्यु रोशनी मंडप अॅन्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना ६० दिवसाचे कालावधीसाठी कार्यादेश देणेस व याकामी येणारे अपेक्षीत रक्कम रु.९,८१,१३६/- मात्रचे खर्चास चक्रीय पध्दतीचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |

सन २०१६ मधील उन्हाळयाचे (दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस) कालावधीत साईभक्तांचे सुविधेसाठी मंडप व्यवस्था करणेकामी रु.२४.६७ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत होता. समाधी मंदिर परिसरात मोकळया जागेत एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रीकचे छत असलेले शेडस् उभारणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे दाखल करणेत आलेल्या Civil Application No.1776/2014 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.१४/०१/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

*"The Present application is rejected because request for permanent M.S. Structure around temple would ruin not only its look but would be obstruction for the devotees. During festival time temporary structures are erected for shed and said practice appears to be proper."*

मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेशानुसार वरीलप्रमाणे मंडपाचे खर्चास मा. उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपीठाचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही, अशी या विभागाची धारणा होती. त्यानुसार इकडील विभागामार्फत दि.२५/१२/२०१५ रोजी खर्चाचा व याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन ई - निविदा मागविणेकामी प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार प्रशासकीय मान्यतेसाठी २५ दिवस, ई - निविदा प्रक्रियेसाठी २५ दिवस, व मंडप उभारणीचे कामासाठी १० दिवस असा एकूण ६० दिवसाचा कालावधी लागेल असा अंदाज होता. त्यानुसार मूळ प्रस्ताव दि.२५/१२/२०१५ रोजी मंडपाचा कालावधी दि.०१/०३/२०१६ रोजी सुरु होणेपुर्वी ६६ दिवस अगोदर सादर करणेत आला होता.
माहीतीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडपव्यवस्था करणेकामी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **मंदिर परिसरात कार्यान्वित केलेल्या सीसीटीव्ही तसेच इतर सुरक्षा यंत्रणेच्या CAMC बाबत.**

**विषय नं.१२** **सन 2015-2016 या आर्थिक वर्षात देणगी आलेल्या वाहनांची नोंद घेणेबाबत.**

**विषय नं.१३** **जुनी वाहने जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**विषय नं.१४** **न्यासाच्या/ समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापराबाबत.**

**विषय नं.१५** **वाहन क्र.एम.एच.17/ ए.जी- 2419 (रुग्णवाहिका) वाहनाचे झालेल्या वाढीव दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.१६** **गोदरेज टेबल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.१७** **समाधी मंदिराचे सभामंडपाचे बाहेरील बाजूस असलेल्या भालदार-चोपदार मूर्तीची जागा बदलणेबाबत.**

**विषय नं.१८** **मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे (withdraw) घेणेबाबत.**

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पासाठी ISO, Security, IT Service Management System,Website Quality, Bio-metric Device Testing, software & system Etc., बाबत केंद्र शासनाचे STQC (Standardisation Testingn and Quality Certification) पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणेबाबत.**

**विषय नं.२०** **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडून अंतीम करणेकामी, प्रत्यक्ष सादरीकरणानंतर संबंधीत कंपन्यांनी सदरकामी सादर केलेले कोटेशन उघडणेस तसेच याकामी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत.**

**विषय नं.२१** **संस्थानचा अधिकृत टि.व्ही. चॅनेल तयार करणेकामी तज्ञ, अनुभवी व उच्च शिक्षित सल्लागाराची नेमणुक करणेकामीचे प्रस्तावास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत.**

**विषय नं.२२** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेबाबत.**

**विषय नं.२३** **संस्थान प्रकाशीत कै.शिवराम ठाकूर लिखीत साईसतचरित्र हिंदीचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेबाबत.**

**विषय नं.२४** **जर्मन भाषेतील साईचरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.**

**विषय नं.२५** **संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित-मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे रंगीत फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकरीता स्विकारणेबाबत.**

**विषय नं.२६** **व्दारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इले.मोटार व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

| | |
|---|---|
| विषय नं.२७ | मा.श्री.विजयकुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे सुचनांप्रमाणे सफाई कर्मचा-यांसाठी रेनकोट खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.२८ | श्री सदगुरु नारायणगीरीजी गुरुकुल, बाभळेश्वर ता.राहाता, जि.अहमदनगर येथील विद्यार्थ्यास मोफत भोजन देणेबाबत. |
| विषय नं.२९ | श्री साईप्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३० | खोल्यामध्ये छोटे साबण पुरविणेबाबत. |
| विषय नं.३१ | लॉन्ड्रीतील जुने मशिन बायबॅक देऊन नविन अत्याधुनिक मशिनरी अशंत: देणगी स्वरुपात स्विकारणे व उर्वरीत रक्कम अदा करणेबाबत. |
| विषय नं.३२ | गाद्या खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मागे घेणेबाबत व प्रकरण निरस्त करणेबाबत. |
| विषय नं.३३ | साईधर्मशाळा विभागातील खोल्यांसाठी ऑनलाईन बुकींग सुविधा सुरु करणे व सेवा आकार बाबत. |
| विषय नं.३४ | लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबत. |
| विषय नं.३५ | शांतीनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्लायडींग गेट तयार करणेबाबत. |
| विषय नं.३६ | श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ, बनविणेचे पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टीलच्या जाळीचे झाकणे बनविणेबाबत. |
| विषय नं.३७ | श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचे प्रमाणे संस्थानचे प्रसादालय किचनसाठी अद्ययावत मशिनरी खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.३८ | श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेस मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३९ | श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून मिळालेल्या पुरस्काराबाबत. |
| विषय नं.४० | जुने गॅस प्लॅन्ट व सिलेंडर मेनीफोल्ड करीता गॅस लिकेज डिटेक्शन सिस्टीम खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.४१ | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेबाबत. |
| विषय नं.४२ | आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणेबाबत दिलेल्या सुचना. |
| विषय नं.४३ | स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेबाबत. |
| विषय नं.४४ | साईआश्रम कडील 320 केव्हीए डिझेल जनसेट क्र.ईएसएन 25311058 ची कंट्रोल असेंब्ली खराब झाल्याने नवीन बसविणेबाबत. |
| विषय नं.४५ | संस्थानचे विविध विभागांना झेरॉक्स पेपर रिम खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.४६ | जाहिरात खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.४७ | धर्मशाळा परिसरातील व्दारावती इमारत समोरील बागेतील चिल्ड्रेन पार्क मध्ये नवीन खेळणी बसविणेबाबत. |
| विषय नं.४८ | तज्ञ सेवानिवृत्त शासकिय अधिकारी यांची श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनाविषयक तसेच बिंदुनामावली कामासाठी व्हिजीटींग पध्दतीने पध्दतीने नियुक्ती करणेबाबत. |
| विषय नं.४९ | माहे नोव्हेंबर- २०१५ व जानेवारी- २०१६ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत. |
| विषय नं.५० | श्री साईबाबा हॉस्पिटलच्या **Ground Floor** येथील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेबाबत. |
| विषय नं.५१ | श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेबाबत. |
| विषय नं.५२ | श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Cell Counter Machine (Cell 210) खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५३ | इलेक्ट्रोलाईट एनालॉइझरचे K Electrode व ISE Printer Model खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५४ | श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्ड या विभागाकरीता Portable LED Dome खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५५ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयातील फर्निचर खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५६ | श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डायलेसीस विभागाकरीता डायलेसीस चेअर खरेदीबाबत. |
| विषय नं.५७ | श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता Instrument खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५८ | श्री साईबाबा रुग्णालयातील Dental O.P.D. या विभागाकरीता Equipment खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.५९ | श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Co, Electronic Endoflator खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.६० | CVTS OT-H, CRU-III, GICU व डायलेसिस विभागातील यु.पी.एस.करीता बॅटरीज खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.६१ | श्री साईबाबा रुग्णालयातील **Casualty** या विभागाकरीता **Multiparameter Monitor** खरेदी करणेबाबत. |

**विषय नं.६२** **श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता Multiparameter Monitor with all Accessories खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.६३** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता** Arthoscope **खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.६४** **श्री साईबाबा रुग्णालयातील** Neuro O.T. **या विभागाकरीता** Instrument **खरेदी करणेबाबत. (अ व ब)**

**विषय नं.६५** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी.या विभागाकरीता** Light Source with Head Lamp **जुने** Buyback **करुन नवीन खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.६६** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने** Fully Automatic Blood Gas Analyser Machine **बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.६७** **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता** Refrigerated Blood Bag Centrifuge Machine **जुने** Buyback **(परत) करुन नवीन खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.६८** **यु.व्ही.एअर स्टरीलायझरचे दुरुस्तीबाबत.**

**विषय नं.६९** **मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१६** **वेळेअभावी उपरोक्त विषय नं.११ ते ६९ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **संस्थान रुग्णालयातील रिक्त पदांसाठी दिलेल्या जाहिरातीनुसार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ व दि. १७/०४/२०१५ रोजीचे आदेश व मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३० नुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रिक्त पदांवर भरती करणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती सदरचे जाहिरातीनुसार अर्ज प्राप्त झालेले आहेत.

जाहिरातीस अनुसरुन आलेल्या अर्जांची तपासणी / छाननी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीतील मा. डीन, बी.जे.एम.सी, पुणे यांचेकडून करुन घेणेसाठी वरिष्ठांचे निर्देशानुसार अर्ज दि. २९/०३/२०१६ रोजी त्यांचेकडे पाठविणेत आले होते त्यावर त्यांनी दि. ०७/०५/२०१६ व दि. १७/०५/२०१६ रोजी ईमेल द्वारे पात्र / अपात्र उमेदवारांची नावे सोबतचे यादीनुसार कळविलेली आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी याकामी दि. २४ मे २०१६ रोजी मुलाखतीही आयोजित कराव्यात असे दुरध्वनीवरुन कळविले आहे.

सदर यादीत Eligible, Eligible (Subject to relaxation) व Not eligible अशा तीन रकान्यात नावे कळविलेली आहेत. सदरच्या यादीत शेवटच्या परिच्छेदात खालीलप्रमाणे मजकुरही कळविलेला आहे.

1. Candidates declared not eligible due to inadequate experience, non-availability vacancy in particular category or age more than permissible but having adequate qualification, may be considered for temporary appointment at discretion of hospital authorities in the interest of patient care.
2. For post of CMO candidates possessing MBBS degree with 2 years experience as CMO/ RMO/ any house post should be considered as eligible.
3. All candidates should bring original documents supporting – Age, Qualification, Experience, Category, non-cremylayer certificate where applicable, etc for verification.
4. Any type discrepancy in documents / foul play with result in disqualification of the candidate.

तथापि, यापुर्वी जाहिरातीमार्फत नेमणूका होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणेकामी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करणेत आले होते त्यावर मा. न्यायालयाने कार्डीओलॉजीस्ट, फिजीशियन, न्युरोसर्जन, बीटीओ, आरएमओ या पदावर तात्पुरत्या स्वरुपात Adhoc Basis वर नेमणूका करणेकामी परवानगी दिलेली आहे.

सबब, मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांनी उपरोक्त अ.नं. ०१ ते ०४ मध्ये नमुद केलेला मजकुर हा शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत आलेला आकृतीबंध तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या अटी-शर्तीस अनुषंगुन नसल्याने मा. डीन यांनी कळविलेल्या Eligible (Subject to relaxation) या रकान्यातील उमेदवरांना मुलाखत पत्र द्यावे किंवा कसे याबाबत निर्णयहोणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा.डीन यांनी कळविलेल्या Eligible (Subject to relaxation) या रकान्यातील उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **संस्थान रुग्णालयातील रिक्त पदांवर नियुक्ती करणेकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी येणा-या तज्ञ समितीचे मानधनाबाबत.**

प्रस्ताव- मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ व दि. १७/०४/२०१५ रोजीचे आदेश व मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३० नुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रिक्त पदावंर भरती करणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. सदरचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज प्राप्त झालेले आहेत.

जाहिरातीस अनुसरुन आलेल्या अर्जांची तपासणी/ छाननी मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीतील मा.डीन, बी.जे.एम.सी., पुणे यांचेकडून करुन घेणेसाठी वरिष्ठांचे निर्देशानुसार अर्ज दि. २९/०३/२०१६ रोजी त्यांचेकडे पाठविणेत आले होते त्यावर त्यांनी दि. ०७/०५/२०१६ व दि. १७/०५/२०१६ रोजी ईमेलद्वारे पात्र / अपात्र उमेदवारांची नावे कळविलेली आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी याकामी दि. २४ मे २०१६ रोजी मुलाखतीही आयोजित कराव्यात असे दुरध्वनीवरुन कळविले आहे.

संस्थान रुग्णालयातील रिक्त पदावंर नियुक्ती करणेकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मा. डीन यांना पुण्याहून येण्याजाण्यासाठी वाहन खर्च तसेच मा. सिव्हील सर्जन, अहमदनगर व गर्व्हनमेंट मेडिकल कॉलेज, पुणे येथील संबंधीत विषयातील तज्ञांना (एकूण २४ व्यक्ती) रस्त्यातील चहा, नाष्टा, जेवण तसेच मानधन याकामी दि. २०/०८/२०१५ च्या त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. २८६ नुसार रक्कम रुपये १,१८,०००/- इतके खर्चास मान्यता देण्यात आली होती.

सबब आताही दि. २४ मे २०१६ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीतील मा. डीन यांना पुण्याहून येण्याजाण्यासाठी वाहन खर्च, मा. सिव्हील सर्जन, अहमदनगर तसेच गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, पुणे येथील संबंधीत विषयातील तज्ञांना रस्त्यातील चहा, नाष्टा, जेवण तसेच मानधन याकामी येणा-या अंदाजे एकुण रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) खर्चासाठी मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.३१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयातील रिक्त पदांवर नियुक्ती करणेकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीतील मा.डीन यांना पुण्याहून येण्या-जाण्यासाठी वाहन खर्च, मा.सिव्हील सर्जन, अहमदनगर तसेच गव्हमेंट मेडीकल कॉलेज, पुणे येथील संबंधीत विषयातील तज्ञांना प्रवासातील चहा, नाष्टा, जेवण तसेच मानधन याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा, हृदयरोग तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी यांचे मानधनाबाबत.**

प्रस्ताव- डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी विधी व्यावसायीक यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबतचा निर्णय होणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २८-१२-२०१५ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ६६४ असा पारित करणेत आला की, प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्टाचे अवलोकन करता ॲडव्होकेट सी. जे. बोरुडे, अहमदनगर यांचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव विचारात घेता, डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक करणेत यावी. तसेच त्यांना द्यावयाचे मानधन कार्यकारी अधिकारी यांनी निश्चीत करुन त्यास समितीची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७ए/५५६९/२०१६ दि. ०८-०१-२०१६ अन्वये ॲडव्होकेट सी. जे. बोरुडे अहमदनगर यांची संस्थानतर्फे सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्यांनी दि. १७-०१-२०१६ पासून कामकाजास सुरुवात केली आहे. त्यांनी संस्थानचे वतीने खातेचौकशीत सादरकर्ते अधिकारी म्हणून १२ तारखांना कामकाज केले आहे.

याकामी नेमण्यात आलेले खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल. देशपांडे सो. पुणे यांना मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०५-०५-२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १४८ प्रमाणे प्रत्येक खाते चौकशी तारखेस रु. ७,५००/- मानधन व रु. ५,०००/- प्रवास, आहार व इतर खर्च पोटी भत्ता देणेबाबत निर्णय झाला आहे. असे एकूण २० तारखांकरीता रु. १,५०,०००/- मानधन देण्याचे ठरले आहे. परंतू खाते चौकशी तारखांची व्याप्ती वाढल्यास मानधनाची रक्कम रु. १,५०,०००/- वरुन रु. २,००,०००/- करणेत आली आहे.

दि.२८-१२-२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा, हृदयरोग तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी ॲड सी. जे. बोरुडे, अहमदनगर यांना प्रत्येक तारखेस मानधन, प्रवासखर्च व इतर सर्व समावेशक खर्चापोटी रु. ५,०००/- मानधन देता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा, हृदयरोग तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी संस्थानतर्फे सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक केलेल्या अॅड.सी.जे. बोरुडे, अहमदनगर यांना प्रत्येक तारखेस मानधन, प्रवास खर्च व इतर सर्व समावेशक खर्चापोटी एकत्रित रु.५०००/- मात्र मानधन देणेच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०४** **रेफरन्स् (आयडीए) नं. ३९/२०१२ श्रीमती सुनंदा किसन जगताप खांबेकर, माजी परिचारीका विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी बाबत मा. कामगार न्यायालयाने दि.२४-११-२०१५ रोजी दिलेल्या निकालाबाबत.**

**प्रस्ताव-** उप कामगार आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी रेफरन्स (आयडीए) नं. ३९/२०१२ श्रीमती सुनंदा किसन जगताप खांबेकर, माजी परिचारीका विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी बाबत दि. २४-११-२०१५ रोजीचा निकालाची प्रत इकडील कार्यालयास दि. १०-०२-२०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत.

AWARD

1. Reference is answered partly in the affirmative as under.
2. It is declared that the act of first party terminating the servives of second party by order dated 14.06.2010 being illegal is quashed and set-aside.
3. The first party is directed to reinstate the second party is service with continuity of services w.e.f. 14.06.2010, but without back wages.
4. Four copies of Award be sent to Dy. Commissioner of Labour, Nashik Division, Nashik for publication thereof.
5. Parties shall bear their own costs.

**कु. सुनंदा जगताप यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास खालीलप्रमाणे आहे.**

कु. जगताप या जा. नं. एसएसएस/वशी १/५२१६/२००६ दि. २२-०४-२००६ अन्वये दि. २८-०४-२००६ पासुन श्री साईबाबा हॉस्पिटल येथे परिचारीका म्हणून कार्यरत होत्या. त्या दि. ०१-०३-२००९ पासुन सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर होत्या. त्यांच्या गैरहजेरीमुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजात अडचणी येत असत. त्याबददल जा. नं. एसएसएस/वशी ७बी/८५६७/२००९ दि. १०-०७-२००९ अन्वये रजिस्टर ए.डी. पोस्टाव्दारे त्यांना पत्र पाठवुन कळविण्यात आले होते की, गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांचे सध्याचे पत्त्यावर व कायमचे पत्त्यावर पोस्टामार्फत पाठविण्यात आले होते. सध्याच्या पत्त्यावर पाठवलेले पाकीट पोस्ट खात्यामार्फत परत आलेले आहे. कायमच्या पत्त्यावर पाठवलेले पत्र त्यांना प्राप्त झाले आहे. परंतू त्या कामावर हजर झाल्या नाही.

कु. जगताप यांनी दि. ०५-०९-२००९ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्या खुलाशात त्यांनी ०१-०३-२००९ पासुन सतत, सलग, विनापरवानगी गैरहजर असल्याचे कबुल केले आहे सदरच्या खुलाशात गैरहजेरीचे कारण प्रेगन्सीचे दिलेले आहे. गैरहजेरी बाबत वरीष्ठांना कळविले नसल्याचेही त्यांनी कबुल केले आहे. प्रेगनन्सी पिरेडमध्ये डॉक्टरांनी बेडरेस्ट घेण्याबाबत सुचविलेले आहे. कामावर हजर होणेसाठी अजुन सहा महिने मुदतीची त्यांनी मागणी केली आहे. सिझेरीयन ऑपरेशन झाल्यामुळे सध्या कामावर येऊ शकत नाही असे म्हटले आहे. सदरच्या खुलाशासोबत त्यांनी डॉ. पंकज नावंदर, सिन्नर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या प्रमाणपत्रात सुनंदा स्वरुप खांबेकर अशा नावाचा उल्लेख आहे. त्या दिनांक ०३-०९-२००९ रोजी बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल झाल्या होत्या. त्यांना कन्या रत्न झाले आहे. त्यांना दि. १०-०९-२००९ रोजी रुग्णालयातून डिसचार्ज दिल्याचे म्हटले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्रात येथुनपुढे सहा महिने बेडरेस्ट घ्यावी असा उल्लेख नाही. सदरच्या खुलाशावर सहाय्यक अधिसेविका यांचा असा अभिप्राय आहे की, कु. जगताप यांनी दि. १८-११-२००९ ते २८-०२-२००९ या दिर्घ कालावधीसाठी रजा उपभोगलेली आहे. त्यानंतर दि. ०१-०३-२००९ पासून त्या सतत, सलग, गैरहजर आहे. त्या किती तारखेला कामावर हजर होणार या बाबतचा खुलाशात स्पष्ट उल्लेख नाही. सध्या परिचारीकेंची संख्या अपुर्ण असल्याने त्यांनी कामावर हजर होणे आवश्यक आहे. संस्थान नियमानुसार मॅटरनिटी लीव्ह संपल्यानंतर त्यांनी तात्काळ कामावर हजर होणे आवश्यक होते.

द मॅटरनेटी बेनिफिट अॅक्ट १९६१ चे कलम ५(३)नुसार १२ आठवडेची मॅटरनेटी लीव्ह बाळंतपणापूर्वी ६ आठवडे व बाळंतपणानंतर ६ आठवडे अशी उपभोगता येईल. परंतु कलम ६ (२) अन्वये अर्जदाराने अशा प्रकारची नोटिस व्यवस्थापनाला देणे आवश्यक आहे. सदरच्या नोटिस सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अशा प्रकारची पुर्तता कु. जगताप यांनी केलेली नाही. कलम ६ (३) नुसार ज्या अर्जदाराने अशी पुर्तता केली नसेल त्यांनी बाळंतपणानंतर शक्यतो लवकरात लवकर पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुसार कु. जगताप यांनी कागदपत्रांची पूर्तता केली नाही.

कु. जगताप या दि. १८-११-२००८ पासुन कामावर येत नाही. मॅटरनेटी बेनिफिट ॲक्ट १९६१ नुसार बाळंतपण रजेचा कालावधी पूर्ण् झालेला आहे. तरी देखिल आणखी सहा महिन्याच्या रजेची मागणी केली होती. कु. जगताप यांची मागणी बेकायदेशिर नाही. त्याबद्दल जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१३४१०/२००९ दिनांक ०३-११-२००९ अन्वये त्यांना रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कळविण्यात आले होते की, द मॅटरनेटी बेनीफीट ॲक्ट १९६१ मधील तरतुदी, कामाची निकडख् त्यांचे खुलाशावरील वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता त्यांना या पुढची दिर्घकालीन रजा मंजूर करता येणार नाही. तरी सदरचे पत्र मिळताच सात दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्थ् नाही असे समजुन संस्थानच्या हजेरी पटावरुन नाव कमी करण्यात येईल. सदरचे पत्र कु. जगताप यांना प्रापत झाले आहे. परंतु त्या कामावर हजर झाल्या नाहीत. तसेच त्यांनी दि. ०५-०९-२००९ रोजीचे अर्जान्वये कामावर हजर होणेसाठी सहा महिन्यांची मुदत मागितली होती ती मुदत देखील संपली तरी त्या कामावर हजर झाल्या नाहीत. अशाप्रकारे कामावर हजर होणेस संधि देवूनही कु. जगताप कामावर हजर झालेल्या नाहीत.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८-०४-२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४०७ नुसार जा. नं. एसएसएस/वशी ७बी/७७९२/२०१० दि. १४-०६-२०१० अन्वये कु. जगताप यांचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे.

तदनंतर श्रीमती सुनंदा किसन जगताप (खांबेकर), माजी परिचारीका यांनी दि. ०५-१०-२०१२ रोजी मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ३९/२०१२ संस्थान विरुध्द दाखल केली होती. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागण्या केल्या होत्या.

अ) कामगारास दि. १४-०६-२०१० पासून कमी करण्याविषयक मालकाचा आदेश बेकायदेशिर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरध्द असल्याचे जाहीर करुन तो रद्द करण्याचे आदेश मालकांना व्हावेत.

ब) दि. दि. १४-०६-२०१० पासून कामगाराची नोकरी सलग धरुन मधील काळातील पूर्ण वेतन देवून व्दितीय पक्षास पूर्ववत सेवेत घेण्याचे आदेश मालकांना व्हावेत.

क) इतर योग्य ते न्यायोचित आदेश व्हावेत.

आवश्यकता वाटल्यास वरील मजकुरात भर घालण्याची दुरुस्ती करण्याची किंवा फेरफार करण्याची परवानगी व्दीतीय पक्षास असावी ही प्रार्थना.

मा.कामगार न्यायालयाने दि. २४-११-२०१५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्रीमती सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. दि. १४-०६-२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावे किंवा मा. उच्च न्यायालयात निर्णयाविरोधात दाद मागावी याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे सभेसमोर सादर करणेकरीता मिटींग विभागास दि. २६-०२-२०१६ रोजी देणेत आला होता. तथापि, सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत आलेल्या नसल्याने, सदरचा विषय चक्रीय पध्दतीने सादर करणेत आला होता त्यावर मा. अध्यक्ष सा◌ो. यांनी दि. ३०-०३-२०१६ रोजी पुढील प्रमाणे निर्देश दिले होते. Call legal opinion on this subject who has conducted this case before the labour court and then place.

त्यासअनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/वशी ७ए/३९/२०१६ दि. ०४-०४-२०१६ अन्वये संस्थान कामगार कायदा सल्लागार ॲड अशोकराव पाटील, अहमदनगर यांना पत्र देवून त्यांचा कायदेशिर मत मागविणेत आले होते.

त्यानुसार ॲड अशोकराव पाटील यांनी दि. ०४-०४-२०१६ रोजीचा कायदेशिर मत दिले असून, त्यात त्यांनी "I have seen the Award passed by Honble Labour Court in reference (I.D.A.) No.39/2012 Dtd. 24.11.2015. It is not in dispute that, the services of Smt. Sunanda Kisan Jagtap were terminated by our Trust alleging misconduct of unauthorized absenteeism. The services of the employees were regulated as per the provisions of Model Standing Orders framed under Industrial Employment (Standing Orders) Act. 1946 prior to adopting our own service rules. It is admitted fact that the termination order dt. 14th June, 2010 specifically state that, Smt. Sunanda Jagtap remained absent w.e.f. 01/03/2009 & inspite of intimation to her she did not reported on duty. As per settled legal position & after referring to contents of termination order the termination of Smt. Sunanda Jagtap is stigmatic & therefore her termination ought to have been followed by holding and conducting a domestic enquiry as per the provision of clause 25 of Model Standing Orders. Admittedly, we have not followed the said statutory provision and therefore Hon Labour Court has taken a view that, the termination is illegal. Another aspect of the matter is about her illness & the Hon Labour Court has therefore. Concluded that the absenteeism is due to bona-fide reasons. It is also important to see that Hon Court has turned down the relief of Back Wages to her. In my opinion the stigmatic termination ought to have been followed by holding and conducting a domestic enquiry in accordance with principles of natural justice and procedure laid down under Model

Standing Orders. We have not followed the said procedure therefore, in my opinion it is not advisable to challenge the said award in Honble High Court"असे नमूद केले आहे.

मा. कामगार न्यायालयाचा दि. २४-११-२०१५ रोजीचा आदेश व त्यावर कामगार कायदा सल्लागार ॲड अशोकराव पाटील यांचा अभिप्राय विचारात घेता कु. सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १४-०६-२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेकरीता चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर.

निर्णय क्र.३२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा.कामगार न्यायालयाचा आदेश दि.२४.११.२०१५ रोजीचा आदेश व त्यावर संस्थानचे कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील यांचा अभिप्राय विचारात घेता कु.सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि.१४.०६.२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पूर्ववत कामावर हजर करुन घेणेस समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करणेत आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५
प्रस्ताव-

**आय.टी. मॅनेजर या पदाचे लेखी परीक्षा तसेच मुलाखतीबाबत.**

अ) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि.१२/०२/२०१६ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे आय.टी.मॅनेजर हे रिक्त पद पदोन्नतीने अथवा सरळसेवेने भरावे याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता, त्यावर समितीने निर्णय क्र.१८७ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन एकमताने असे ठरले की, आय.टी.मॅनेजर या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधून आय.टी.मॅनेजरची नेमणूक करणेत यावी. तसेच हे पद तांत्रिक स्वरुपाचे असल्यामुळे या क्षेत्रातील तज्ञांस त्रीसदस्यीय समितीच्या अध्यक्ष व सदस्यांसह बोलावून मुलाखती घेऊन, गुणवत्तेने-सेवाज्येष्ठता (Merit-cum-Seniority) या तत्वाने योग्य कर्मचा-याची आय.टी.मॅनेजर या पदावर निवड / नियुक्ती करणेत यावी, सदरहू कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी, असे ठरले."

ब) उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आय.टी.मॅनेजर या पदाची १०० गुणांची लेखी परीक्षा व मुलाखत घेणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचा संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये कळवून याकामापोटी संस्थानला किती मानधन अदा करावे लागेल, तसेच या कामासाठी तारीख व वेळ मिळणेस विनंती करण्यात आलेली आहे.

आता, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी दि.१२ मे २०१६ रोजी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

Please find in the attachment the above referenced letter which have been assigned nomination as experts to 1.Dr.Jagannath V. Aghav 2. Dr.Vinod K. Pachghare.

We will conduct comprehensive objective test of 100 marks 3 hours, which will assess knowledge of engineering graduates, followed final verification in the interview to check suitability of candidates.

The honorarium usually paid by national agencies is Rs.8000/- per subject expert. Paper setting will be Rs.2000/- per subject expert. We both subjects shall complete the assignment. Travel expenses by car shall be Rs.4800/- per subject expert (approx, you can reimburse at actual, if you desire)

One day accommodation may please be arranged prior to the date of interview.

The probable dates are May 16, 17 or 23

वरीलप्रमाणे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी आय.टी.मॅनेजर या पदाचे लेखी परीक्षा व मुलाखतीचे आयोजन करणेकामी तारीख, मानधन व इतर खर्चाचा तपशील कळविला आहे.

(१) परंतु मा.त्रिसदस्य समितीने दि.१९/०५/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे संस्थान कामाविषयी सभेचे आयोजन केले आहे. सदर सभेचे दिवशी आय.टी.मॅनेजर या पदाची लेखी परीक्षा व मुलाखत घेणेबाबत प्रा.डॉ.जगन्नाथ व्ही.आघाव, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेशी आज दि.१६/०५/२०१६ रोजी दूरध्वनीद्वारे विचारणा केली असता, ते दि.१९/०५/२०१६ रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत लेखी परीक्षा व सायंकाळी ५ वाजता मुलाखत घेण्यास तयार असल्याचे त्यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. तरी दि.१९/०५/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आय.टी.मॅनेजर या पदाची लेखी परीक्षा व मुलाखत घेऊन पात्र उमेदवाराची निवड करता येईल, त्यास मान्यता असावी.

(२) तसेच कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी आ.टी.मॅनेजर या पदाचे लेखी परीक्षा व मुलाखतीचे कामापोटी प्रत्येक तज्ज्ञासाठी रु.८०००/- मानधन + रु.२०००/- पेपर सेटींग चार्जेस तसेच वाहतुक खर्च रु.४८००/- असे एकूण रु.१४,८००/- x २ = २९,६००/- अधिक प्रत्येक तज्ज्ञासाठी एक या प्रमाणे दोन ए.सी.रुम्स विनामुल्य (एक दिवसासाठी) इतका खर्च कळविलेला आहे. सदरचा खर्च त्यांना अदा करणेस मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३२१** आय.टी. मॅनेजर या पदांच्या मुलाखती घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रा.डॉ.जगन्नाथ व्ही.आघाव व प्रा.डॉ.विनोद के. पाचघरे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी सभेबरोबर त्यांचे मानधनाबाबत व मुलाखतीबाबत चर्चा केली व आज दि.१९.०५.२०१६ रोजी दुपारी ०२.०० वाजता आय.टी.मॅनेजर या पदाचे उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेतल्या व त्याचे सिलबंद करणेत आलेले पाकिट सायंकाळी ०५.०० वाजता सभेसमोर उघडले. त्यानंतर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे येथील तज्ञ तसेच समिती अध्यक्ष व सदस्य यांनी आय.टी. मॅनेजर पदाच्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आय.टी. मॅनेजर या पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतींचा सविस्तर अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच मुलाखत घेणेकामी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून बोलविणेत आलेल्या तज्ञांना लेखी परीक्षा व मुलाखतीचे कामापोटी प्रत्येक तज्ज्ञासाठी रु.८०००/- मानधन + रु.२०००/- पेपर सेटींग चार्जेस तसेच प्रत्यक्ष येणारा प्रवास खर्च अदा करणेत यावा व शिर्डी येथे त्यांची निवास, भोजन, दर्शन/आरती व्यवस्था विनामुल्य करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र.३०६ ते ३२१ सर्वानुमते घेण्यात आले.
सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**